# नागपूर महानगरपालिका, नागपूर

# (जनसंपर्क विभाग)

प्रसिध्दी पत्रक                                        दिनांक - 27/12/2019

## डॉ. पंजाबराव देशमुख जयंती निमित्त म.न.पा. तर्फे अभिवादन

शिक्षणमहर्षि आणि देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्त नगरीच्या उपमहापौर श्रीमती मनिषा कोठे, नगरसेवक श्री. सुनिल हिरणवार, श्री.किशोर जिचकार, नगरसेविका श्रीमती उज्वला शर्मा यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठा समोरील स्व. भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी उपायुक्त राजेश मोहिते, सौंदर्यीकरण समिती सचिव बबन चौधरी, अशोकराव म्हात्रे, डॉ.एस.टी. देशमुख, एम.एम. देशमुख, डॉ.निंबाळकर, डॉ. अजय तायवाडे, दिलीप मोहितकर, प्रणय पराते, ज्ञानेश्वर खरात व पंजाबराव कृषी विदयापीठ व शिवाजी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

तसेच म.न.पा. केंद्रीय कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या तैलचित्राला उपमहापौर श्रीमती मनिषा कोठे यांनी नगरीच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.